# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,

## महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

**(महिला व बाल विकास विभाग)**

सत्यमेव जयते

कार्यालयाचा पत्ता :- रायगडभवन, रिअर विंग, पहिला मजला,सी.बी.डी. बेलापूर-४००६१४.
*Email- comicdsraigadbhavan@gmail.com* दुरध्वनी क्र. ०२२-२७५७६३८८,३२२,३२३ Fax-०२२-२७५७६३२४


जा.क्र.एबाविसेयो/का-४/ १९४४ /२०२० दिनांक- ०१/०७/२०२०

प्रति,

१) जिल्हा कार्यक्रम अधिकारी / उपमुख्य कार्यकारी (बा.क.),
जिल्हा परिषद---------- (सर्व)

२) बाल विकास प्रकल्प अधिकारी,
(नागरी)----------- (सर्व)

**विषय - कोरोना विषाणू (Covid १९) संसर्गाच्या कालावधीत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचे ग्रोथ मॉनिटरिंग सुरू करणे बाबत.**

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र. एबावि-२०२०/प्र.क्र.१६३/का-६ दि. १ जुलै, २०२०

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अतितीव्र कुपोषित मुले शोधणे व नियमितपणे बालकांचे वजन उंची घेण्यासाठी ग्रोथ मॉनिटरिंग करणे आवश्यक आहे. तथापि लॉक डाऊन च्या कालावधीत / सद्यस्थितीत सदरचे कामकाज होत नसल्याने नवीन अतितीव्र कुपोषित बालकांचा शोध घेणे अशक्य झालेले आहे. याकरिता शासनाने संदर्भीय पत्रान्वये कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्गाच्या कालावधीत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचे ग्रोथ मॉनिटरिंग सुरु करण्याकरिता अंगणवाडी केंद्राचे संनियंत्रण व कामकाज करणे आवश्यक असल्याने खालील प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने शासनाने संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या मान्यतेने खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

१. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी नियमित स्वरूपात अंगणवाडी केंद्र उघडावे.
२. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी अंगणवाडी केंद्रात उपस्थित राहत असताना मास्क वापरणे व Sanitizer चा वापर करणे आवश्यक राहील. तसेच वारंवार साबणाने हात धुवावेत. अंगणवाडी केंद्राचे कामकाज करीत असताना तोंडाला, नाकाला व डोळयांना स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी.
३. अंगणवाडी केंद्राचे कामकाज करीत असताना सामाजिक अंतर (Social Distancing) (किमान एक मीटर) पाळण्यात येईल याची काळजी घ्यावी.
४. अंगणवाडी केंद्रात एका दिवसात पाच मुलांना / गरोदर व स्तनदा माता यांना वजन-उंची घेण्यासाठी बोलविण्यात यावे. याप्रमाणे सर्व बालकांची वजन-उंची दरमहा घेण्यात यावी व त्याची नोंद CAS मध्ये करण्यात यावी. तसेच बालकांची वजन-उंची घेतल्यानंतर वाढ निरिक्षण साधनांना वेळोवेळी sanitized करण्यात यावे.
५. नवजात बालकांसाठी वजन घेण्याकरिता वापरण्यात येणारे वजन काटे वापरासंदर्भात झोळीसाठी आवश्यक असलेला कपडा लाभार्थ्यांच्या पालकांनी घरुनच आणावा अशा सूचना देण्यात याव्यात.

६. ज्या लाभार्थ्यांना सर्दी, खोकला व ताप अशा प्रकारची लक्षणे असतील त्यांना अंगणवाडी केंद्रात बोलविण्यात येऊ नये.

७. अंगणवाडीत झालेल्या कामकाजाची नोंद कॉमन एप्लीकेशन सॉफ्टवेअर (CAS) मध्ये दैनंदिन स्वरूपात घेण्यात यावी.

८. अंगणवाडी सेविका यांनी नियमित स्वरूपात गृहभेटी द्याव्यात तसेच गृहभेटी देताना अतितीव्र कुपोषित बालके (SAM), गरोदर माता यांना प्राधान्याने भेटी देण्यात याव्यात.

९. ० ते १२ महिन्याच्या आतील बालकांचे संपुर्ण लसीकरण करावे आणि सदर बालकांचे लसीकरण झालेले नसल्यास ANM सोबत पाठपुरावा करुन पुर्ण करुन घ्यावेत.

१०. पूर्व शालेय शिक्षण संदर्भात आयुक्तालयामार्फत यापूर्वी देण्यात आलेल्या निर्देशानुसार पालकांच्या व्हाट्सअप ग्रुपद्वारे कार्यक्रम घेण्याची कार्यवाही करावी.

११. सर्व लाभार्थ्यांना आहाराचे वाटप करीत असताना सोशल डिस्टन्ससिंगचे पालन करण्यात यावे तसेच आहाराचे वाटप झाल्यानंतर त्याची नोंद दैनंदिन स्वरूपात कॉमन अप्लिकेशन सॉफ्टवेअर मध्ये घेण्यात यावी.

१२. कोरोना विषाणू संसर्गअंतर्गत रेड झोन म्हणून घोषित असलेले तसेच कंटेनमेंट झोन म्हणून घोषित असलेल्या ठिकाणी राहत असलेल्या लाभार्थ्यांचे वजन-उंची घेण्यात येऊ नयेत तसेच अशा परिसरात गृहभेटी देखील देण्यात येऊ नयेत. मात्र पूर्व शालेय शिक्षणाचे उपक्रम यापूर्वी दिलेल्या निर्देशानुसार सुरू ठेवण्यात यावेत.

१३. अंगणवाडी केंद्रात प्राप्त असलेले अथवा प्राप्त होणारे बेबी केअर किटचे शासनाच्या निकषाप्रमाणे व कोरोना विषाणूचा संसर्ग होणार नाही याची काळजी घेऊन तात्काळ पात्र लाभार्थ्यांना वाटप करण्यात यावे.

१४. आदर्श अंगणवाडी योजनेअंतर्गत ज्या अंगणवाडी केंद्राची निवड झालेली आहे अशा अंगणवाडी केंद्रात आदर्श अंगणवाडीसाठी प्राप्त होणारे साहित्य स्वीकारण्यात यावे. तसेच आदर्श अंगणवाडीसाठी संबंधित पुरवठाधारकामार्फत करण्यात येणाऱ्या कामकाजास सहकार्य करावे.

१५. दरमहा बालकांचे वजन, उंची घेऊन स्क्रीनिंग केल्यावर नव्याने प्राप्त होणाऱ्या अति तीव्र कुपोषित (SAM) बालकांसाठी यापूर्वीच आयुक्तालयामार्फत दिलेल्या निर्देशानुसार Home Based VCDC राबविण्यात याव्यात. तसेच सदर अति तीव्र कुपोषित बालकांना EDNF हा आहार उपलब्ध करून देण्यात यावा.

उपरोक्त नमूद निर्देशांचे तंतोतंत पालन करण्यात येऊन अंगणवाडी केंद्रांचे कामकाज नियमित स्वरूपात सुरू करण्यात यावे, व तसा अहवाल शासनास व आयुक्तालयास सादर करण्यात यावा.

1/7/2020

(इंद्रा मालो, भाप्रसे)
आयुक्त,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

प्रत,

१) मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर
२) सर्व जिल्हाधिकारी,
३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४) सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, ६ महसुली विभाग,